महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

फोन क्र : (०२०) २६१२७९०६ Website: https://mahaprisons.gov.in

# महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा वार्तापत्र

**माहे -एप्रिल-२०२६**

## संपादकीय संदेश

**शुभेच्छा संदेश**



**श्री.सुहास वारके**
**महासंचालक**
**कारागृहे व सुधार सेवा,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रिय सर्व अधिकारी व कर्मचारी,

राज्यातील सर्व मध्यवर्ती, जिल्हा व खुले कारागृह येथील बंदीजनांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. यशंवतराव चव्हाण मुक्त विदयापीठ व इंदिरा गांधी मुक्त विदयापीठ यांच्या माध्यमातून बंदीजनांना इयत्ता 10 वी, 12 वी, पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रम विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

कारागृहातील शिक्षक, कारागृह अधिकारी/कर्मचारी यांनी बंदीजनांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करून त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करावी. प्रत्येक बंदीजनास शिक्षण हे त्याच्या जीवनातील सकारात्मक परिवर्तनाचे माध्यम आहे, याची जाणीव करून द्यावी. शिक्षा पूर्ण झाल्यानंतर समाजामध्ये सन्मानाने जीवन जगण्यासाठी व रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी शिक्षण अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

## शुभेच्छा संदेश

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हा संदेश समाज परिवर्तनासाठी प्रेरणादायी आहे. “शिका आणि शिकवा ”या विचारांचा अंगीकार करून कारागृहातील शिक्षण चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी सर्वांनी पुढील काळात अधिक जोमाने कार्य करावे .प्रत्येक कारागृहामध्ये शिक्षणाचा आलेख अधिक वाढवून जास्तीत जास्त बंदीजनांना शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी करून घेणे ही सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची सामूहिक जबाबदारी आहे.

महाराष्ट्र राज्यातील सर्व कारागृहांमध्ये बंदीजनांच्या शिक्षणासाठी सातत्याने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांमुळे अनेक बंदीजन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होत आहेत. इयत्ता 10 वी, 12 वी, पदवी, पदव्युत्तर शिक्षण तसेच विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांमध्ये बंदीजनांचा वाढता सहभाग हा कारागृह अधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांचा परिणाम आहे. बंदीजनांना शिक्षणासाठी प्रेरित करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व सकारात्मक बदल निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. शिक्षणामुळे बंदीजनांच्या पुनर्वसनास मोठी मदत होत असून समाजामध्ये सन्मानाने जीवन जगण्याची नवी दिशा मिळत आहे.

“शिक्षण हेच परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.” बंदीजनांच्या जीवनामध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून त्यांना चांगला नागरिक बनविण्यासाठी व बंदीजनांच्या शिक्षणासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सर्व अधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांना हार्दिक शुभेच्छा व पुढील कार्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

जय हिंद.

महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

**मुक्त विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र व विविध कौशल्य अभ्यासक्रम प्रमाणत्राचे वितरण**

नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये दिनांक १३.०४.२०२६ रोजी मा. श्री डॉ. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक ,कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला बंद्याना कारागृहामध्ये बंद्यानी घेतलेल्या उच्च शिक्षणामध्ये त्यांना मिळालेल्या मुक्त विद्यापीठ प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

नागपूर मध्यवर्ती कारागृह येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ,नाशिक येथुन सन २०२५ मध्ये ११ बंद्यानी यशस्वीरीत्या पदवी संपादन केले आहे .सर्व बंद्याना पदवी प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच इंदीरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ दिल्ली , येथुन सन २०२५ मध्ये ०३ बंद्यानी यशस्वीरीत्या पदव्युतर पदवी संपादन केली आहे. सर्व उत्तीर्ण बंद्याना प्रमाणपत्र देण्यात आले. श्री श्री रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट यांच्या मार्फत सोलार पॅनल बसविणे याचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते. सदर कौशल्य् प्रशिक्षण उत्तीर्ण बंद्याना महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य व उद्योजकता विकास विभागाचे वतीने प्रमाणपत्र देण्यात येते. अशा २४ बंद्याना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.



**मुक्त विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र व विविध कौशल्य अभ्यासक्रम प्रमाणत्राचे वितरण**

## नागपूर मध्यवर्ती कारागृह

रामचंद्र प्रतिष्ठाण मुंबई यांच्या तर्फे राष्ट्रभक्तीपर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रथम क्रमांकास एक हजार रोख व प्रमाणपत्र द्वितिय क्रमांकास सातशे पन्नास रोख व प्रमाणपत्र तृतिय क्रमांकास पाचशे रूपये रोख व प्रमाणपत्र आणि उत्तेजनार्थ बक्षिसास दोनशे पन्नास रूपये रोख व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते सर्व ३८ बंद्याना प्रमाणपत्र प्रदाण करण्यात आले.

आजचे प्रमुख अतिथी मा. श्री डॉ. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक ,कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी बंद्याना मार्गदर्शनात शिक्षण हे वाघिणिचे दुध आहे या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदेशाची आठवण करून दिली. पदवी आणि शिक्षण यांतील फरक समजावून सांगितला. कारागृह प्रशासणाने उपलब्ध करून दिलेल्या विविध कौशल्य प्रशिक्षणाचा व विविध योजनांचा जास्तीत जास्त बंदीबांधवानी लाभ करून घ्यावा, असे आवाहन यावेळी केले. विविध कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बंद्याना कारागृहातुन मुक्त झाल्यानंतर या प्रमाणपत्राच्या आधारे रोजगार मिळवुन समाजामध्ये सन्मानाने जगता येईल. असे कारागृहातील बंद्याना सखोल मोलाचे मार्गदर्शन केले.



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

## पिडीलाईट इंडस्ट्रीज यांच्या मार्फत कोस्टर बनविणे कार्यशाळेचे आयोजन

## नागपूर मध्यवर्ती कारागृह

श्री. वैभव आगे कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक पुर्व विभाग नागपूर, यांच्या मार्गदर्शनाखाली बंद्यासाठी कोस्टर बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यशाळेमध्ये बंद्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. अशा स्पर्धामुळे त्यांचे मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईल. अशा स्पर्धामुळे बंद्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. सकारत्मकता, आत्मविश्वास आणि कलागुणांना वाव देण्याच्या उददेशाने अशा कार्यक्रमाचे आयोजन नागपूर मध्यवर्ती कारागृहात करण्यात येत असते. सदरील कार्यशाळा श्रीमती प्राजक्ता लुले मॅडम ,प्रतिनिधी, पिडीलाईट इंडस्ट्रीज यांच्या उपस्थित पार पडली. सदरील कार्यशाळेत ७९ पुरुष शिक्षा बंदी उपस्थित होते.









महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या मुलांकरिता निबंध स्पर्धेचे आयोजन**

श्री वैभव आगे कारागृह अधीक्षक, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमीत्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धा वयोमानाप्रमाणे तिन गटात घेण्यात आल्या. प्रत्येक गटातील विजेत्यांना पारीतोषीक देऊन त्यांचे मनोबल वाढवण्यात आले. या स्पर्धामध्ये कारागृहातील अधिकारी/कर्मचारी यांच्या मुलांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.



**पिडीलाईट इंडस्ट्रीज यांच्या सौजन्याने फॅब्रीक पाऊच पेंटीग करण्याच्या कार्यशाळेचे आयोजन**

पिडीलाईट इंडस्ट्रीज यांच्या सौजन्याने फॅब्रीक पाऊच पेंटीग करण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेमध्ये सर्वानी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईल व सुप्त कलागुणांना वाव मिळतो. सकारत्मकता,आत्मविश्वास आणि कलागुणांना वाव देण्याच्या उददेशाने अशा कार्यक्रमाचे आयोजन नागपूर मध्यवर्ती कारागृहात करण्यात येत असते.



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**मा. प्रमुख व जिल्हा सत्र न्यायाधीश श्री. एस डी. जगमलानी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव माननीय न्यायाधीश श्री.नितीन पाटील यांनी बुलढाणा जिल्हा कारागृहास भेट दिली**

# बुलढाणा जिल्हा कारागृह

आज दिनांक.02.04.2026 रोजी मा. प्रमुख व जिल्हा सत्र न्यायाधीश श्री. एस डी. जगमलानी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव माननीय न्यायाधीश श्री.नितीन पाटील यांनी बुलढाणा जिल्हा कारागृहास भेट दिली.कारागृहातील दवाखाना विभाग, महिला विभाग, सर्कल विभाग, मुलाखत, तसेच बांधकामाची पाहणी केली. व प्रशासनाबद्दल समाधान व्यक्त केले.






महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

## नाशिरोड मध्यवर्ती कारगृह

**निबंध स्पर्धा आयोजन**

कारागृहातील बंदी बांधवांसाठी रामचंद्र प्रतिष्ठान, मुंबई या संस्थेच्या वतीने दर वर्षी स्वातंत्र्याचे व देशभक्तीचे महत्व बंदी बांधवांमध्ये वाढीस लागावे या उद्देश्याने राष्ट्रभक्तीपर निबंध स्पर्धेचे नियमितपणे आयोजन करण्यात येते. यावर्षी मा. अधिक्षक नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह नाशिक अरूणा मुगूटराव यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ०६/०४/२०२६ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती करागृहात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये एकुण 61 पुरुष व महिला बंद्यांनी सहभाग घेऊन विविध विषयावर निबंध सादर केले.






**गुड फ्रायडे**

सीड्स ऑफ होप या संस्थेसमवेत नाशिरोड मध्यवर्ती कारगृहात दि. ०३/०४/२०२६ रोजी गुड फ्रायडे सण साजरा करण्यात आला. सदर सण बंदीबांधवा समवेत साजरा करण्यासाठी संस्थेचे प्रादेशिक व्यवस्थापक इलविस डिसोझा व त्यांचे सहकारी उपस्थित होते. या प्रसंगी ख्रिश्चन धर्माच्या प्रथेप्रमाणे पुजा-अर्चना करुन येशु ख्रिस्तांच्या जिवनावर आधारीत विविध प्रकारची गाणे सादर करण्यात आली.





महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

# छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह

**बंद्याकरिता सहा दिवसीय योग परिचय शिबिराचे आयोजन**

दि.०६ एप्रिल २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह येथे रा.स्व.संघ समिती प्रांत, छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या वतीने बंद्याकरिता सहा दिवसीय ( दि.०६ते ११ एप्रिल २०२६) योग परिचय शिबिराचे आयोजन करण्यात आले.



**आरोग्य विभागाच्या प्रतिनिधी मार्फत रेबीज प्रतीबंधाबाबत मार्गदर्शन**

मिशन रेबीज या उपक्रमाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह येथे दि. ०६/०४/२०२६ रोजी खुले कारागृहातील बंद्याकरिता आरोग्य विभागाच्या प्रतिनिधी मार्फत कुत्रे तसेच इतर प्राण्यांपासून रेबीज प्रतीबंधाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



# तळोजा मध्यवर्ती कारागृह

**“जीवन विद्या मिशन, यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्यासाठी व्यसनमुक्ती, प्रबोधन व समुपदेशन.**

दि. २ एप्रिल २०२६, १० एप्रिल २०२६ आणि २३ एप्रिल २०२६ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ सो यांच्या प्रमुख मार्गदर्शननुसार, “जीवन विद्या मिशन, पनवेल, जि.रायगड” यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्यासाठी व्यसनमुक्ती, प्रबोधन व समुपदेशन कार्यक्रम आयोजित केला गेला यासाठी एकुण १०९ बंद्यांनी सहभाग नोंदवला.



**गुड फ्रायडे निमित्त “प्रार्थनेचे आयोजन”**

दि.२ एप्रिल २०२६ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे प्रिझन मिनिस्ट्री, मुंबई यांचे विद्यमाने कारागृहातील ख्रिस्ती बंद्यासाठी गुड फ्रायडे निमित्त “प्रार्थनेचे आयोजन” आयोजित केले यात ५२ बंद्यांनी आपला सहभाग नोंदवला.



## हनुमान जयंतीनिमित्त अधिकारी/ कर्मचारी व त्यांच्या कुटूंबातील सदस्यांसाठी भजनगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन

## नागपूर मध्यवर्ती कारागृह

श्री. वैभव आगे, कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग नागपूर, यांच्या मार्गदर्शनाखाली हनुमान जयंतीनिमित्त भजन गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवुन अध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेतला. भजन गीते यांसारख्या संगीताधारीत उपक्रमांमुळे मानसिक ताणतणाव कमी होऊन मन शांत राहते. कारागृहातील कारगृह अधिकारी व कर्मचारी तसेच कारागृह पुरुष कर्मचारी यांचे महिला कुटूंबातील सदस्यांनी अतिशय मनसोक्तपणे भजन गीतांचा आस्वाद घेतला.







महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

श्री. वैभव आगे, कारागृह अधीक्षक, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय नागपूर तर्फे मोफत दंतरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये 128 पुरुष बंदी बांधवानी दंतरोग तपासणी व 03 महिला बंदी भगिणी यांनी दंतरोग तपासणी शिबिराचा लाभ घेतला.







**नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये दंतरोग तपासणी शिबिराचे आयोजन**

महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

"सुधारणा पुनर्वसन" हे महाराष्ट्र कारागृहाचे ब्रिद वाक्य असुन कारागृहातील बंदयांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कारागृहात विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून नागपूर मध्यवर्ती कारागृहामधील महिला व पुरुष बंदयांना तसेच महीला कारागृह अधिकारी/कर्मचारी व पुरुष अधिकारी/ कर्मचारी यांच्या महिला कुटुंबियासांठी क्ले ज्वेलरी, वारली पेंटीग, ले पेपर वेट, फॅब्रिक पाऊच, टोट बॅग, लिपन आर्ट आणि कोस्टर हस्तकला अशा विविध हस्तकला वस्तु बनविण्याचे प्रशिक्षण पिडीलाईट फेविक्रील इंडीया,नागपूर यांचे सौजन्याने देण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये नागपूर मध्यवर्ती कारागृहातील 40 महिला बंदी व 79 पुरुष बंद्यानी तसेच 41 महिला कर्मचारी व महिला कुटुंबियांनी सहभाग घेतला होता.

मुंबई सर्वोदय मंडळ व सहयोग ट्रस्ट नागपूर यांचे तर्फे विविध गटांमध्ये "गांधी विचारधारा" निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकुण 81 पुरुष व महिला बंद्यानी सहभाग घेतला होता. महात्मा गांधीजी नेहमी तुरुंगाला शिक्षा केंद्र न मानता सुधारगृह मानत असत. गुन्हा हा एक आजार आहे आणि गुन्हेगार हा एक समाजव्यवस्थेचा बळी आहे, त्यामुळे तुरुंग अधिकाऱ्याने एका डॉक्टर प्रमाणे त्यावर उपचार करणे आवश्यक आहे

सदर प्रशिक्षणामध्ये तसेच निबंध स्पर्धेमध्ये उत्कृष्ठ कामगीरी करणाऱ्या महिला व पुरुष बंदयांना व महिला कर्मचारी व महिला कुटुंबियांना दिनांक 25.04.2026 रोजी प्रमुख अतिथी सन्मा.न्यायमुर्ती श्री.अनिल एस.किलोर साहेब, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर, सन्मा.न्यायमुर्ती श्रीमती उर्मिला जोशी फळके मॅडम उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर व वरिष्ठ ॲड. देवेंद्रकुमार चव्हाण साहेब, मुख्य शासकिय अभियोक्ता उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बंदयांनी तयार केलेल्या वस्तु समाजातील लोकांपर्यंत पोहचाव्यात व बंदयांना देखील कारागृहात रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच कारागृहातुन बंदी मुक्त झाल्यानंतर पुन्हा गुन्हेगारीकडे न वळता सुशिक्षित नागरीक म्हणून त्यास आपली उपजिविका पार पाडता यावी व स्वत:चे व कुटुंबाचे पालन-पोषण करता यावे, यासाठी कारागृहात बंदयांना विविध प्रकारचे व्यवसायाभिमुक प्रशिक्षण देवून प्रमाणपत्र देण्यात येते.

कार्यक्रमाचे सुरवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कारागृहात वृक्षारोपन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी कारागृहाचे कारखाना विभागात बंदयामार्फत तयार करण्यात आलेल्या कारागृह निर्मित वस्तुंची पाहणी केली व खरेदी करुन बंदी कौशल्याचे कौतुक केले.

**नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे सन्मा. न्यायमुर्ती श्री.अनिल किलोर साहेब, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर व सन्मा.न्यायमुर्ती श्रीमती उर्मिला जोशी फळके मॅडम उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे हस्ते विविध हस्तकला कौशल्य प्रशिक्षण व गांधी विचारधारा निबंध स्पर्धा प्रमाणत्राचे वितरण**

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

**नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे सन्मा. न्यायमुर्ती श्री.अनिल किलोर साहेब, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर व सन्मा.न्यायमुर्ती श्रीमती उर्मिला जोशी फळके मॅडम उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे हस्ते विविध हस्तकला कौशल्य प्रशिक्षण व गांधी विचारधारा निबंध स्पर्धा प्रमाणत्राचे वितरण**

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सन्मा.न्यायमुर्ती श्रीमती उर्मिला जोशी फाळके मॅडम यांनी बंदयांनी प्रशिक्षणादरम्यान बनविलेल्या हस्तकला वस्तुंचे कौतुक केले व कोणताच माणुस हा जन्माजात गुन्हेगार नसतो उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे तो गुन्हेगार ठरत असतो. त्यामुळे बंदयांनी कारागृहात घेतलेल्या प्रशिक्षणाचा फायदा निश्चितच कारागृहातुन सुटल्यानंतर होईल. त्यामुळे प्रत्येक बंदयांनी अशा प्रकारच्या प्रशिक्षणात सहभागी व्हावे असे मोलाचे मार्गदशन केले.

प्रमुख अतिथी सन्मा. न्यायमुर्ती श्री. अनिल एस. किलोर साहेब यांनी बंद्याना कारागृह शिक्षा भोगत असतांना सकारात्मक विचार ठेवावा यासाठी दैनंदीन मेडीटेशन व योगाभ्यास करावा, सकारात्मक विचारसरणी करीता आपल्या बुध्दीकौशल्याचा वापर करुन मनावर नियंत्रण ठेवावे व सतत काहीतरी नविन निर्माण करण्याचा प्रयत्न करावा, यासाठी कारागृहामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रशिक्षणामध्ये व उपक्रमामध्ये सहभागी होवून स्वत:ला व्यस्त ठेवावे असे मोलाचे मार्गदर्शन केले.







## तळोजा मध्यवर्ती कारागृह

**इस्टर संडे निमित्ताने “प्रार्थनेचे आयोजन”**

दि.५ एप्रिल २०२६ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ सो यांच्या प्रमुख मार्गदर्शन व सुचने नुसार, प्रिझन मिनिस्ट्री, मुंबई यांचे विद्यमाने कारागृहातील ख्रिस्ती बंद्यासाठी इस्टर संडे निमित्ताने “प्रार्थनेचे आयोजन” आयोजित केले यात ६१ बंद्यांनी आपला सहभाग नोंदवला.





**तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे खेळवण्यात आलेल्या बुद्धिबळ, कॅरम, लुडो आणि होलीबॉल स्पर्धेत यशस्वी बंद्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.**

दि.१४ एप्रिल २०२६ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ सो यांच्या प्रमुख मार्गदर्शन व सुचने नुसार, कारागृहात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने कारागृहातील मंडळाअंतर्गत खेळवण्यात आलेल्या बुद्धिबळ, कॅरम, लुडो आणि होलीबॉल स्पर्धेत यशस्वी बंद्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.





## तळोजा मध्यवर्ती कारागृह

**"समता फाउनडेशन" यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्यासाठी "नेत्र चिकित्सा शिबीर" आयोजित**

दि. २३ एप्रिल २०२६ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ सो यांच्या प्रमुख मार्गदर्शन व सुचनेनुसार, "समता फाउनडेशन" यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्यासाठी "नेत्र चिकित्सा शिबीर" आयोजित, यामध्ये एकुण ११६ बंद्यांनी सहभाग नोंदवला.



**सुभेदार दत्ताराम धोंडी अमृते यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमाचे आयोजन**

दि. ३० एप्रिल २०२६ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ सो यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली , सुभेदार दत्ताराम धोंडी अमृते यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहाच्या प्रांगणात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती साजरी**

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागह

दि. १४/०४/२०२६ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागहाच्या प्रांगणात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहाच्या अधिक्षक मा. अरुणा मुगूटराव मॅडम व अतिरिक्त अधिक्षक मा. सचिन चिकणे साहेब याच्या हस्ते दिपप्रज्वलीत करुन डॉ बाबसाहेब आंबेडकर व  भगवान गौतम बुध्द यांचया प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बंदी दिपक शिरसाठ यांनी केले असून बंदी राहूल काळे, प्रकाश लोंढे व राहूल जगताप यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रवासावर भाषणे सादर करून सर्वांचे लक्ष वेधले. यानंतर मा. अधिक्षक अरुणा मुगूटराव मॅडम यांनी आपले मनोगत व्यकत करतांना डॉ बाबसाहेब आंबेडकर यांचा आदर्श आपण नेहमी समोर ठेऊन जीवन जगायला हवे असे अवाहन सर्व बंदी बांधवांना केले व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.









महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**टाटा स्ट्राईव्ह वोल्टास सेंटर या संस्थेमार्फत पुरुष व महिला बंद्यासाठी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात स्वच्छता सहाय्यक या प्रशिक्षण शिबीराचे आयोजन**

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागह

श्रीमती अरूणा मुगूटराव, अधिक्षक नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली कारागृह विभागाचे सुधारणा व पुनर्वसन हे ध्येय साध्य करण्याच्या उद्देश्याने टाटा स्ट्राईव्ह  वोल्टास सेंटर या संस्थेमार्फत पुरुष व महिला बंद्यासाठी दि. 21/04/2026 ते 23/04/2026 पर्यंत नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात स्वच्छता सहाय्यक या प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या तीन दिवसीय शिबीरासाठी टाटा स्ट्राईव्ह वोल्टास सेंटर या संस्थेच्या वतीने श्रीमती. नीता पाटील, श्री सचिन सोनवणे आणि मुकेश घरटे हे उपस्थित होते. सदर  शिबीरात बंदी बांधवांनी विविध ठिकाणी स्वच्छाता करतांना नियोजन कसे करावे, साधने हाताळतांना कोणती काळजी घ्यावी, स्वच्छता प्रमुख म्हणून कोणत्या जबाबदा-या पार पाडाव्यात या संदर्भात मौखिक स्वरूपात माहीती देऊन प्रात्यशिक तसेच लेखी परिक्षा घेण्यात आल्या.












महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

**प्रयास टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबई व सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहामध्ये क्षयरोग दृढीकरण कार्यक्रम**

प्रयास टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबई व सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहामध्ये दिनांक 29.04.2026 रोजी बंदी बांधवासाठी टी.बी . हारेगा देश जीतेगा या संकल्पनेखाली क्षयरोग दृढीकरण कार्यक्रम घेण्यात आला. ज्यामध्ये बंदी बांधवांना क्षयरोगाची लक्षणे , परिणाम, व उपाययोजना या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. सदर मार्गदर्शन करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या कडून समुपदेशक म्हणुन श्री. अजय जाधव व श्री. भगवान भागवत हे उपस्थित होते.



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली**

## तळोजा मध्यवर्ती कारागृह

दि.१४ एप्रिल २०२६ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ सो यांच्या प्रमुख मार्गदर्शन व सुचनेनुसार, कारागृहात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली कार्यक्रम संपन्न झाला यात २१२ बंदी बांधव सहभागी झाले होते.









तळोजा मध्यवर्ती कारागृहातील बंदी “श्री. सुनिल दामू उंबरसडा ” याने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने त्यांची प्रतिमा रेखाटून त्यांना आदरांजली वाहिली.

**अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली**

**उडाण ट्रस्ट, अमरावती व शहर क्षयरोग कार्यालय, महानगरपालिका, अमरावती यांचे सहकार्याने सर्व बंदयांचे क्षयरोग तपासणी**

# अमरावती मध्यवर्ती कारागृह

दिनांक १४/०४/२०२६ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली तसेच गीतगुंजन परिवार, अमरावती या संस्थेच्या सहकार्याने भीमगीतांचे सुरेल गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.




दिनांक १६/०४/२०२६ रोजी पासून अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे उडाण ट्रस्ट, अमरावती व शहर क्षयरोग कार्यालय, महानगरपालिका, अमरावती यांचे सहकार्याने सर्व बंदयांचे क्षयरोग तपासणी व औषधोपचार कार्यक्रमास सुरवात करण्यात आलेली असून बंदयाचे Hand held portable X-Ray अत्याधुनिक मशीनव्दारे तपासणी करुन क्षयरोगाने बाधित बंदयावर औषधोपचार करण्यात येणार आहेत.





महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

# अमरावती मध्यवर्ती कारागृह

**अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे मा.श्री.आशिष येरेकर, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली त्रैमासिक अभिविक्षक मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली**

दिनांक २४/०४/२०२६ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे मा.श्री.आशिष येरेकर, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली त्रैमासिक अभिविक्षक मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली यावेळी जिल्हयातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी मा.महोदयांचे हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सींग क्युबिकल्स कक्षाचे व अतिरिक्त अधीक्षक यांचे शासकीय निवासस्थानाचे उद्घाटन करण्यात आले. मा.महोदयांनी पाकगृहाचे आधुनिकीकरण बांधकामाची पाहणी, व्हीसी कक्ष, एक्सप्रेस फ्रीडर, सुरक्षा विषयक तटभिंतीचे बाजूने व्हयुज कटर बसविणेबाबत सूचना दिल्या, तसेच कारागृह सुरक्षा व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले.

